**<u>ठळक बातम्या</u>**

- जगाला भेडसावणाऱ्या समस्यांचं शाश्वत स्वरूपात निराकरण करण्यात नवभारत जगाचं नेतृत्व करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवडक भाषणाच्या पुस्तकाचं प्रकाशन
- एकात्मिक जैव शुद्धीकरण मोहिमेच्या नवोन्मेषी पथदर्शी प्रकल्पाची विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंह यांची पहिल्या गोलमेज परिषदेत घोषणा
- आजच्या आंतरराष्ट्रीय संकेत भाषा दिनानिमित्त दिव्यांगासंबंधित संस्थांमधे विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला दुसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना नागपूरात होणार

**<><><><><>**

जगाला भेडसावणाऱ्या समस्यांचं शाश्वत स्वरूपात निराकरण करण्यात नवभारत जगाचं नेतृत्व करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमध्ये एकता नगर इथं आयोजित केलेल्या सर्व राज्यांच्या पर्यावरण मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झालं, त्यावेळी ते बोलत होते.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी पासून पर्यावरणास्नेही जीवनशैलीचा पुरस्कार करणाऱ्या 'लाइफ मूव्हमेंट' या जागतिक उपक्रमापर्यंत भारत सर्वात पुढे आहे, असं ते म्हणाले. नवीन भारत, नवीन दृष्टिकोन आणि नव्या विचारांच्या साहाय्यानं झेप घेत आहे, भारत आज एक झपाट्यानं विकसित होणारी अर्थव्यवस्था असून पर्यावरणाचं

रक्षण करण्यासाठी आपण सातत्यानं प्रयत्न करत आहोत, पर्यावरण रक्षण ही वैयक्तिक नाही तर सामूहिक जबाबदारी असल्याचं ते म्हणाले. भारताच्या वनक्षेत्रात वाढ झाली असून पाणथळ जागांची संख्या देखील वाढली आहे, गेल्या काही वर्षांत गिर मधले सिंह, वाघ, हत्ती, एकशिंगी गेंडा आणि बिबट्या यांची संख्या वाढली आहे. भारतात चित्यांचं झालेलं स्वागत म्हणजे भारताच्या आदरातिथ्याचं उदाहरण आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. सर्व राज्यांनी पर्यावरण संवर्धनासाथीच्या सर्वोत्तम पद्धती जाणून घ्याव्यात आणि देशभरात त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, काल ब्रिक्स परराष्ट्र व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय संबंध मंत्र्यांच्या बैठकीत न्यूयॉर्क इथं सहभागी झाले होते. दक्षिण आफ्रिकेचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि सहकार मंत्री डॉ. नालेदी पांडोर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक 2023 मध्ये होणाऱ्या BRICS अध्यक्षपदासाठी होती. ब्राझीलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री कार्लोस अल्बर्टो फ्रँको फ्रांका, रशियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सर्गेई लावरोव्ह आणि मंत्री चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांनी त्यांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व केले.

मंत्र्यांनी राजकीय, सुरक्षा, आर्थिक आणि शाश्वत विकास क्षेत्रातल्या संयुक्त राष्ट्रांच्या धोरणाच्या प्रमुख जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर या बैठकीत आढावा घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील सर्वसमावेशक अधिवेशनाला जलद अंतिम रूप देण्याचं आणि स्वीकारण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन कालपासून महाराष्ट्रातल्या बारामती लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर आहेत. भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा प्रवास योजनेअंतर्गत आयोजित या दौऱ्यात आज त्यांनी पुरंदर तालुक्यातल्या जेजुरी इथल्या खंडोबा मंदिरात जाऊन दर्शन घेतलं तसंच पुरंदर मधल्या पंचायत प्रतिनिधींशी स्थानिक प्रश्नांवर संवाद साधला. त्यानंतर त्यांनी मोरगाव इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आयुष्मान भारत योजनेच्या लाभार्थ्यांची देखील भेट घेतली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवडक भाषणांचं संकलन आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवनात प्रकाशित झालं. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास - प्रधानमंत्री नरेंद मोदी के भाषण' असं या पुस्तकाचं नाव असून हे हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमधून प्रकाशित होत आहे. या समारंभाला केरळचे राज्यपाल अरिफ मोहम्मद, माजी उपराष्ट्रपती एम वेंकय्या नायडू, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर,आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुस्तकात प्रधानमंत्र्यांनी मे २०१९ पासून मे २०२० पर्यंत केलेल्या ८६ भाषणांचा समावेश आहे. आत्मनिर्भर भारत, कोविड विरुद्धचा लढा, परराष्ट्र व्यवहारातील भारताची बदलती भूमिका, जय किसान, इत्यादी १० विषयांमध्ये ही भाषण विभागली असून, नूतन भारताच्या नागरिकांच्या आशा आकांक्षांना जनसहभागाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचं प्रधानमंत्र्यांचं स्वप्न या पुस्तकातून दर्शवलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी 'मन कि बात' या कार्यक्रमातून देशाच्या जनतेशी संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ वाजता

आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित होणार असून हा या कार्यक्रमाचा त्र्यांणवावा भाग आहे. ए आय आर न्यूज, डी डी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यु ट्यूब वाहिन्यांवरूनही या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. या हिंदी कार्यक्रमानंतर त्याचा प्रादेशिक भाषांमधील अनुवाद आकाशवाणी सादर करेल.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून बिहारच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात असून ते पूर्णिया आणि किशनगंज मधल्या अनेक कार्यक्रमांत सहभागी होतील. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भारतीय जनता पक्षाशी संबंध तोडल्यापासून शाह यांची ही पहिलीच बिहार भेट आहे. ते आज पूर्णियामध्ये जनभावना रॅलीला संबोधित करतील. त्याशिवाय ते पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची भेट घेतील तसंच ते पक्षाच्या सुकाणू समितीची बैठक घेऊन त्यात राज्यातल्या राजकीय परिस्थितीबद्दल चर्चा करतील. बिहारमधल्या बदललेल्या राजकीय परिस्थितीत ही भेट फार महत्वाची असल्याचं बिहार भाजप अध्यक्ष संजय जैस्वाल यांनी म्हटलं आहे.

<><><><>

जम्मू-कश्मीर सरकारनं शेजारी राज्यांमधून गुरांची आवक करण्यावर २५ ऑक्टोबरपर्यंत बंदी घातली आहे. जम्मू-कश्मीरसह काही राज्यांमध्ये पसरलेल्या लंम्पी त्वचारोगाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. जम्मू-कश्मीर मधल्या जिल्ह्यांत आपापसात गुरांची वाहतूक करण्यावरही बंदी घातल्याचं सरकारनं म्हटलं आहे. परिस्थिती सुधारेपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे.

<><><><>

देशव्यापी कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत आज सकाळपासून ५ लाखापेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. त्यामुळे आतापर्यंत लाभार्थ्यांना

दिलेल्या मात्रांची एकूण संख्या २१७ कोटी ३१ लाखाच्या वर गेली आहे. त्यात १९ कोटी ९४ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

राज्यात आज सकाळपासून २० हजारापेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. राज्यात आत्तापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या १७ कोटी ६८ लाखाच्या वर गेली आहे. त्यात ८९ लाख ७१ हजारापेक्षा जास्त नागरिकांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

**<><><><><>**

शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी आपल्यालाच परवानगी मिळावी यासाठी शिवसेनेने दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरु झाली आहे. कालही या याचिकेवर सुनावणी झाली होती. मात्र, शिवसेनेच्या वकीलांनी केलेल्या विनंतीनंतर ही सुनावणी एक दिवसासाठी तहकूब करण्यात आली होती. शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घ्यायची परवानगी मिळावी असा अर्ज  शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे तसंच शिंदे गटानं मुंबई महापालिकेकडे दाखल केला होता. महापालिकेनं कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देत दोघांना  परवानगी नाकारली. यावर शिवसेनेनं मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.  याच याचिकेवर आज न्यायमूर्ती आर. डी. धानुका आणि न्यायमूर्ती कमल काथा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होत आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला दुसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना आज नागपूर इथं विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. आज संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरु होईल. मंगळवारी मोहाली इथं झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर पाच गडी राखून मात करत या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><><>

ब्राझील, कॅनडा, युरोपियन आयोग आणि ब्रिटन यांच्या सहकार्यानं विकसित केलेल्या एकात्मिक जैव शुद्धीकरण मोहिमेच्या नवोन्मेषी पथदर्शी प्रकल्पाची घोषणा विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंह यांनी केली आहे. येत्या पाच वर्षांमध्ये ऊर्जा संशोधन, विकास आणि प्रात्यक्षिकं याक्षेत्रात अधिकाधिक आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि वित्त पुरवठा व्हावा यासाठी प्रयत्न करणं हा या मोहिमेचा उद्देश आहे, असं ते म्हणाले. जागतिक स्वच्छ ऊर्जा कृती मंचानं आयोजित केलेल्या, शाश्वत जैव ऊर्जा आणि जैव-शुद्धीकरण प्रकल्प या विषयांवरच्या पहिल्या गोलमेज परिषदेत ते आज अमेरिकेत बोलत होते. देशाच्या ऊर्जा परिदृश्यात लक्षणीय बदल आणण्यासाठी भारत स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात निरंतर कार्य करत असून 2030 पर्यंत 500-गीगावॅट गैर-जीवाश्म ऊर्जा क्षमता गाठण्याचं भारताचं उद्दिष्ट आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांनी आजचा दिवस आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणून जाहीर केला आहे. ‘सर्वांना जोडणारी संकेत भाषा’ ही या वर्षीची संकल्पना आहे. देशभरातील दिव्यांगजन सक्षमीकरण विभाग, मूकबधीर दिव्यांगांसाठी असलेली विद्यालयं यांच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व राष्ट्रीय संस्थांमध्ये हा दिन साजरा करण्यासाठी अधिकाधिक लोकसहभागासह विविध उपक्रम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

<><><><><>